९५९३४/३८

जाक्र/शिउस/पुवि/उमा-१/प्रवेश/२०११
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१
यांचे कार्यालय,
दि. ८.८.२०११ 5 AUG 2011

प्रति,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, पुणे, अहमदनगर व सोलापूर

विषय :- सी.बी.एस.ई.मंडळाशी संलग्न असलेल्या शाळांतील विदयार्थ्यांच्या इ. ११ वी प्रवेशाबाबत.

संदर्भ :- १. शासन पत्र क्र.एचएसी-१७११/(२७३/११)/उमाशि-१ दि. ३.८.२०११
२. मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील पत्र क्रमांक एचएससी/१५२०११/११वी प्रवेश/१२एचएस/ दि. ३.८.२०११

महाराष्ट्र राज्यामध्ये सी.बी.एस.ई.मंडळाशी संलग्न असणाऱ्यां शाळांमध्ये ज्या विदयार्थ्यांनी सन २०१०-२०११ या वर्षामध्ये इ. १० वीची परीक्षा शालेय स्तरावर देवून उत्तीर्ण केली आहे, अशा विदयार्थ्यांना राज्य मंडळाशी संलग्न असलेल्या कनिष्ठ महाविदयालयामध्ये इ. ११ वीत प्रवेश घेण्यासाठी सदर ठिकाणी सी.बी.एस.ई. बोर्डाची शाळा नसावी ही अट अंतर्भूत केलेली होती. ही अट शासनाच्या दिनांक १५ जून २०११ च्या पत्रामध्ये अंतर्भूत केलेली होती. या अटीमुळे सी.बी.एस.ई. बोर्डाच्या शाळांमधून परीक्षा दिलेल्या सर्व विदयार्थ्यांना इ. ११ वीच्या प्रवेशापासून वंचित रहावे लागत होते.

शासनाने पत्र क्र.एचएसी-१७११/(२७३/११)/उमाशि-१ दि. ३ ऑगस्ट २०११ च्या पत्रानुसार सदरची अट रद्द केलेली आहे, व शासनाने पुढील आदेश निर्गमित केलेले आहेत.

" सी.बी.एस.ई.बोर्डाच्या ज्या विदयार्थ्यांनी इ. १० वीची परीक्षा शाळा स्तरावर देवून उत्तीर्ण केली आहे, अशा विदयार्थ्यांना राज्य मंडळाशी संलग्न असलेल्या कनिष्ठ महाविदयालयात इ. ११ वीत प्रवेश घेण्यासाठी सदर ठिकाणी सी.बी.एस.ई.बोर्डाची उच्च माध्यमिक शाळा नसावी ही अंतर्भूत करण्यात आलेली अट रद्द करण्यात येत आहे.

पी.टी.ओ.पान २..

२.        सी.बी.एस.ई.बोर्डाच्या ज्या विदयार्थ्यांनी त्याची इ. १० वीची परीक्षा शाळा स्तरावर देवून उत्तीर्ण केली आहे. अशा विदयार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेवून त्यांना राज्य मंडळाशी संलग्न असलेल्या कनिष्ठ महाविदयालयात विविध बोर्ड स्तरावरुन इ. १० वीची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विदयार्थ्यांचे इ. ११ वीतील प्रवेश पूर्ण झाल्यानंतरच त्यांच्या हिताला कोणत्याही प्रकारची बाधा न येता शिल्लक राहिलेल्या जागांवर सी.बी.एस.ई.बोर्डाच्या या विदयार्थ्यांना खास बाब म्हणून फक्त शैक्षणिक वर्ष २०११-१२ करिता प्रवेशदेण्यात यावा. त्याचप्रमाणे शासनाच्या दि. १५.६.२०११ च्या पत्रान्वये दिलेल्या निर्देशानुसार त्यांना सी.बी.एस.ई.बोर्डाची बोर्ड स्तरावरुन पुन्हा बहिस्त परीक्षा देण्याची आवश्यकता राहणार नाही. "

वरीलप्रमाणे शासन आदेश निर्गमित केलेले असल्यामुळे ज्या विदयार्थ्यांनी सी.बी.एस.ई.बोर्डाशी संलग्न असलेल्या शाळांतून परीक्षा दिलेली आहे, अशा सर्व विदयार्थ्यांना दि. ८.८.२०११ पासून या विदयार्थ्यांना दि. ८.८.२०११ पासून कनिष्ठ महाविदयालय/ उच्च माध्यमिक शाळांमध्ये रिक्त असणाऱ्या जागांवर प्रवेश घेण्यासाठी त्यांनी परस्पर संबंधित महाविदयालयाशी संपर्क साधण्याबाबत आपण आपल्या स्तरावरुन योग्य ती कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास कळवावा.

(सुनिल मगर)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१

प्रत माहितीसाठी.
१. श्री.सं.पु.खोरगडे, अवर सचिव (उमाशि-१),
   शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२. मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक),
   महाराष्ट्र राज्य, पुणे-१